# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांकः05.09.2026** **वारःशनिवार**

---

1. राष्ट्रीय शिक्षक दिनानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारांचं वितरण
2. नेपाळमधल्या पुरग्रस्त भागातून आतापर्यंत 169 भारतीय नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात यश, तर 275 भारतीय नागरिक अद्याप बेपत्ता
3. भगवान श्रीकृष्णांचा जन्मोत्सव काल रात्री देशभरात उत्साहात साजरा
4. अहमदाबाद इथं आजपासून जागतिक दिव्यांग तिरंदाजी स्पर्धा आणि
5. महिला क्रिकेटमध्ये टी20 आशिया करंडक स्पर्धेत, आज भारत आणि पाकिस्तान यांच्यात लढत

**<u>शिक्षक दिन-राष्ट्रपती</u>**

प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ, तत्वज्ञ, लेखक आणि माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी 5 सप्टेंबर रोजी देशात राष्ट्रीय शिक्षक दिन पाळला जातो. यानिमित्त राष्ट्रपती मुर्मू यांनी माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना आदरांजली अर्पण केली असून, एक असामान्य शिक्षक असं त्यांचं वर्णन केलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञांना त्यांचं ज्ञान अद्ययावत ठेवण्याचं, तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्याचं आणि अध्यापनाच्या नावीन्यपूर्ण पद्धतींचा अवलंब करण्याचं आवाहन केलं आहे. शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञ आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देण्यात आणि त्यांचं चारित्र्य घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात, असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. दरम्यान, राष्ट्रपतींच्या हस्ते नवी दिल्ली आज इथं 48 शालेय शिक्षकांना आणि उच्च शिक्षण संस्थांमधील 21 शिक्षक आणि प्राध्यापक आदींना 'राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहेत.

**<u>नेपाळ-भारतीयांची सुटका</u>**

नेपाळमधील पूरग्रस्त त्रिशुली बाजार भागातून काल आणखी तीन भारतीय नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आलं, यात एका पाच वर्षांच्या मुलाचाही समावेश आहे. आतापर्यंत सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आलेल्या भारतीयांची एकूण संख्या 169 झाली आहे, तर 275 भारतीय नागरिक अजूनही बेपत्ता आहेत. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी काल नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांना ही माहिती दिली. चीनमधून 1907 भारतीयांनी नेपाळमध्ये सुरक्षित प्रवेश केला असून, काठमांडूमधील भारतीय दूतावास सुरक्षित बाहेर काढलेल्या भारतीयांच्या मायदेशी परतण्यासाठी विमान प्रवासाची व्यवस्था करत आहे. तिबेट स्वायत्त प्रदेशात कोणताही भारतीय प्रवासी अडकलेला नाही, असंही जयस्वाल यांनी सांगितलं. भारतानं नेपाळला 95 टन मदत साहित्य पुरवलं असून, नेपाळ सरकारच्या आवश्यकतेनुसार भारत मदतकार्य सुरू ठेवेल, असंही त्यांनी स्पष्ट केलं. दरम्यान, नेपाळमध्ये पुरामुळं मरण पावलेल्यांची संख्या 1295 वर पोहोचली असून, बचाव पथकांना आणखी मृतदेह सापडले आहेत. बचाव पथकांनी 12,000 हून अधिक लोकांची सुटका केली असली, तरी सुमारे 5000 लोक अजूनही बेपत्ता आहेत.

**<u>जन्माष्टमी</u>**

भगवान श्रीकृष्णांचा जन्मोत्सव काल अष्टमीला मध्यरात्री देशभरात उत्साहात साजरा करण्यात आला. उत्तर प्रदेशात मथुरेमध्ये श्रीकृष्ण जन्मभूमी मंदिरातही विविध धार्मिक विधींसह जन्मोत्सव करण्यात आला. पश्चिम बंगाल, दिल्ली, महाराष्ट्रासह विविध ठिकाणच्या इस्कॉन मंदिरांसह विविध श्रीकृष्ण मंदिरांमध्ये भक्तिमय वातावरणात जन्मोत्सव साजरा झाला. महाराष्ट्रात आज विविध ठिकाणी गोपाळकाला अर्थात दहीहंडीचं आयोजन करण्यात आलं आहे.

**उपराष्ट्रपती-चेन्नई**

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आज तमिळनाडूच्या एक दिवसीय दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान, ते चेन्नई इथं हृदयाच्या झडपा आणि संरचनात्मक आजारांवरील प्रगत उपचार या विषयावरील 'इंडिया व्हॉल्व्हज 2026' या राष्ट्रीय शैक्षणिक परिषदेत सहभागी होतील. त्यांच्या हस्ते चेन्नईतील गिंडी इथं 'इंडिया व्हॉल्व्ह रजिस्ट्री'चं उद्घाटन होणार असून, 'दिनमलार' वृत्तपत्राच्या 75 व्या वर्षानिमित्त विशेष टपाल तिकिट प्रकाशन सोहळ्यालाही ते उपस्थित राहणार आहेत.

**पंतप्रधान-श्री राम कॉलेज**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्ली इथं 'श्री राम कॉलेज ऑफ कॉमर्स'च्या शताब्दी सोहळ्यात सहभागी होणार आहेत. उद्योगपती सर श्री राम यांनी 1926 मध्ये या महाविद्यालयाची स्थापना केली होती. दिल्ली विद्यापीठाचा भाग असलेलं आणि वाणिज्य, अर्थशास्त्र आणि व्यवस्थापन क्षेत्रातील दर्जेदार शिक्षणासाठी प्रसिद्ध असलेलं 'श्री राम कॉलेज ऑफ कॉमर्स' देशातील एक प्रमुख उच्च शिक्षण संस्था आहे.

**राष्ट्रीय चाचणी**

राष्ट्रीय चाचणी संस्था अर्थात एनटीएनं इंग्रजी, वाणिज्य आणि समाजशास्त्र विषयांसाठी युजीसी नेट परिक्षेला बसणाऱ्या उमेदवारांची प्रवेशपत्रं जारी केली आहेत. येत्या 9 आणि 10 सप्टेंबर रोजी ही परीक्षा होणार आहे. या विषयांच्या प्रश्नपत्रिकेमध्ये त्रुटी आढळल्यानंतर संस्थेनं पुनर्परीक्षेची घोषणा केली होती.

**गृहमंत्री-गोवा**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आजपासून तीन दिवसांच्या गोवा दौऱ्यावर जात आहेत. गृह मंत्रालयाच्या विविध विभागांशी संबंधित आणि गोव्याशी निगडित मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी उद्या त्यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक होणार असून, त्यानंतर ते अमली पदार्थांच्या विषयावर पत्रकार परिषदेला संबोधित करतील. संध्याकाळी, 'अटल भवन' इथल्या भाजपच्या नवनिर्मित राज्य कार्यालयाच्या इमारतीचं उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार असून, पक्षाच्या राज्य कोअर कमिटीची बैठकही ते घेणार आहेत. सोमवारी ते 'वेस्टर्न झोनल कौन्सिल'ची बैठक आणि गोवा पोलिसांचा 'प्रेसिडेंट्स कलर्स' पुरस्कार सोहळा या कार्यक्रमांना उपस्थित राहणार आहेत.

**डॉ. एस. जयशंकर**

परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल वॉर्सा इथं पोलंडचे राष्ट्राध्यक्ष कॅरोल नवरोकी यांची भेट घेतली आणि भारत-पोलंड धोरणात्मक भागीदारीबाबत चर्चा केली. त्यांनी 'भारत-पोलंड संसदीय गटा'च्या सदस्यांचीही भेट घेतली आणि भारत-पोलंड यांच्यातील संबंध अधिक दृढ करण्याबाबत विचार-विनिमय केला. तत्पूर्वी, जयशंकर यांनी 'संयुक्त कृती आराखडा 2024 ते 28' च्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी पोलंडचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री रादोस्लाव सिकोरस्की यांची भेट घेतली. यावेळी युक्रेनमधील संघर्षासह विविध प्रमुख जागतिक आणि प्रादेशिक मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली; तसंच हा संघर्ष संपुष्टात आणण्यासाठी संवाद आणि मुत्सद्देगिरीला चालना देण्याच्या गरजेवर भर देण्यात आल्याचं जयशंकर यांनी सिकोरस्की यांच्यासमवेत संयुक्तपणे प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं.

**भारत आणि बेल्जियम संबंध**

भारत आणि बेल्जियम यांच्यात सागरी क्षेत्रातलं सहकार्य वाढवण्याचं आश्वासन बेल्जियमचे पंतप्रधान बार्ट दे वीव्हर यांनी दिलं आहे. भारत-युरोपीय महासंघ मुक्त व्यापार कराराबाबत काल मुंबईत झालेल्या भारत-बेल्जियम उच्चस्तरीय चर्चासत्रात ते बोलत होते. यावेळी केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. सेमीकंडक्टर, हरित हायड्रोजन, संरक्षण, शेती आणि अन्नप्रक्रिया आणि दागिने अशा एकंदर पाच क्षेत्रांमध्ये बेल्जियम आणि भारत यांच्या अर्थव्यवस्था एकमेकांना पूरक आहेत, असं मत यावेळी गोयल यांनी व्यक्त केलं. भारत आणि

बेल्जियम यांच्यातला द्विपक्षीय व्यापार दुप्पट करण्याच्या वाटचालीत महाराष्ट्र महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

**बिहार पूरस्थिती**

बिहारची राजधानी पाटणासह भागलपूर, जहानाबाद, भोजपूर, नालंदा, रोहतास, लखीसराय, वैशाली आदी 14 जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती गंभीर झाली आहे. अनेक नद्या धोक्याच्या पातळीवरून वाहत आहेत, तर सखल भाग पाण्याखाली गेले आहेत. या पुरामुळं जनजीवन मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झालं असून, आठ लाखांहून अधिक लोकांना या पुराचा फटका बसला आहे. विविध जिल्ह्यांमध्ये मदत आणि बचाव कार्य सुरू आहे, असं आपत्ती व्यवस्थापन विभागानं म्हटलं आहे.

**टेनिस**

न्यूयॉर्क इथं सुरू असलेल्या अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत, महिला एकेरीच्या तिसऱ्या फेरीत गतविजेत्या आर्यना सबलिंका हिनं कामिला राखीमोव्हचा 6-3, 6-4 असा पराभव केला. आता पुढल्या फेरीत तिचा सामना अमेरिकेच्या टेलर टाउनसेंडशी होणार आहे. तर पुरुष एकेरीत डॅनिल मेदवेदेवनं आर्थर रिंडरकनेचचा 6-4, 6-4, 6-4 असा सरळ सेटस मध्ये पराभव करत चौथ्या फेरीत धडक मारली.

**बॅडमिंटन**

भारतीय बॅडमिंटनपटू सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी शेन्झेन इथं सुरू असलेल्या 'चायना मास्टर्स सुपर 750' बॅडमिंटन स्पर्धेच्या उपान्त्य फेरीत प्रवेश केला आहे. डेन्मार्कच्या किम ॲस्ट्रिप आणि अँडर्स स्कारूप रासमुसेन या जोडीवर त्यांनी 21-13, 16-21, 21-18 अशी मात केली. पुरुष एकेरीत हाँगकाँगच्या ली च्युक युकडून पराभव झाल्याने भारताच्या किदंबी श्रीकांतचं स्पर्धेच्या उपउपान्त्य फेरीतलं आव्हान संपुष्टात आलं आहे.

**पॅरातिरंदाजी**

अहमदाबाद इथं आजपासून जागतिक दिव्यांग तिरंदाजी स्पर्धेची सुरुवात होणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते काल दूरदृश्य प्रणालीद्वारे या स्पर्धेचं औपचारिक उद्घाटन करण्यात आलं. या स्पर्धेत 29 सदस्यांच्या भारतीय संघासह 19 देशांतील 105 खेळाडू सहभागी झाले आहेत. जागतिक दिव्यांग तिरंदाजी स्पर्धेच्या मालिकेतला हा तिसरा टप्पा आहे.

**क्रिकेट**

महिला क्रिकेटमध्ये टी20 आशिया करंडक स्पर्धेत, आज अ गटाच्या शेवटच्या सामन्यात भारत आणि पाकिस्तान संघाची लढत होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री आठ वाजता दुबई आंतरराष्ट्रीय मैदानावर हा सामना होईल. भारतानं यापुर्वीचे दोन्ही सामने जिंकून उपांत्य फेरीत आपलं स्थान पक्कं केलं आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.